ISSN 2349-638X
IMPACT FACTOR 4.574

# INTERDISCIPLINARY NATIONAL SEMINAR

on

## Role of Women in Literature, Humanities, Commerce & Sciences

15th sept. 2018

**ORGANIZER**

**VITTHALRAO PATIL MAHAVIDYALAYA, KALE**

[Arts, Commerce And Science]
Tal. Panahala Dist. Kolhapur (MS)

SPECIAL ISSUE OF
AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
PEER REVIEW & INDEXED JOURNAL
www.aiirjournal.com

EDITORS
Prin. Ladgaonkar B.M.
Dr. Selukar S.M.
Prof. Patil N.V.
Prof. Jadhav M.J.
Prof. Kamble J.A.

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 61 | अनिल मोहनराव चव्हाण | मधु कांकरिया का उपन्यास 'सेज पर संस्कृत' में नारी संघर्ष | 198 To 199 |
| 62 | प्रा.सुनिल खोत | भीष्म साहनी का 'माधवी' नाटक : स्त्री जीवन की कहानी | 200 To 201 |
| 63 | डॉ. प्रदीप लाड | आधुनिक हिंदी कविता में नारी की भूमिका (रेवा टिबरेवाल की कविता बुद्ध होना आसान है। के संदर्भ में) | 202 To 204 |
| 64 | डॉ. विनोद प्रभाकर चन्नाळ | अलका सरावगी का उपन्यास 'शेष कादम्बरी' में चित्रित नारी | 205 To 206 |
| 65 | प्रा. डॉ.प्रकाश शंकरराव चिकुर्डेकर | हिंदी आत्मकथा साहित्य में महिला लेखिकाओं की भूमिका | 207 To 211 |
| 66 | श्री. नामदेव आप्पा नांदवडेकर | स्त्री शिक्षण व समाज विकास | 214 To 215 |
| 67 | प्रा. पी.बी. तटाळे | भारतीय कुटीरउद्योगातील स्त्रियांचे महत्त्व | 216 To 217 |
| 68 | प्रा. विक्रम सयाजी यमगेकर<br>प्रा. सुरेश गणपतराव धुरे | वायूकन्या पी.टी.उषा – क्रीडा क्षेत्रातील योगदान | 218 To 220 |
| 69 | डॉ. शार्दुल सेलूकर | स्त्रीवादी चळवळीचा महाराष्ट्रातील प्रथम अविष्कार (१८६० ते १९२०) | 221 To 225 |
| 70 | प्रा. कमलाकर एन. राक्षसे | स्त्रीवादी चळवळीचा आढावा | 226 To 228 |
| 71 | प्रा.नरेंद्र.एन.सुर्यवंशी | प्राचीन भारतीय इतिहासामध्ये स्त्रीयांचे संपत्तीविषयी अधिकार | 229 To 231 |
| 72 | डॉ. प्रमिला सुभाष भोसले | जागतिकीकरणाचा भारतीय स्त्रियांवर झालेला परिणाम – एक आढावा | 232 To 234 |
| 73 | प्रा. प्रेरणा एल. चव्हाण | सामाजिकता आणि कथालेखिकांची भूमिका | 235 To 236 |
| 74 | प्रा. डी. एन. सोनकांबळे | दारिद्र्य निर्मुलनात महिला बचत गटाचे योगदान | 237 To 240 |
| 75 | प्रा. डॉ. मधुकर घुतुरे | भारतातील स्त्री चळवळीचा समाजशास्त्रीय अभ्यास | 241 To 245 |
| 76 | श्री.महादेव ज.जाधव | मराठी साहित्यातील स्त्रियांची आत्मचरित्रे : एक चिंतन | 246 To 248 |
| 77 | प्रा.सरला गोपाळ तांबे | बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण | 249 To 252 |
| 78 | श्री डी. एन. महाडिक | महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळीचा अभ्यास | 253 To 257 |
| 79 | प्रा. डॉ.एकनाथ आळवेकर | १९९० नंतरच्या ग्रामीण मराठी कादंबरीतील स्त्री | 258 To 259 |
| 80 | प्रा.श्रीमती मृणालिनी आबासाहेब शिंदे | भवभूतीच्या नाटकांतील स्त्रीभूमिकाः एक अभ्यास | 260 To 264 |
| 81 | कु. नम्रता देविदास ढाळे | भारतीय चित्रपट सृष्टीतील अभिनेत्री म्हणून स्मिता पाटील यांचे योगदान | 265 To 268 |
| 82 | प्रा. डॉ.सौ. सुनिता एस. राठोड | महिला सक्षमीकरणातील बचतगटाची भूमिका | 269 T 272 |

# वायूकन्या पी.टी.उषा – क्रीडा क्षेत्रातील योगदान

प्रा. विक्रम सयाजी यमगेकर
शारीरिक शिक्षण संचालक
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

प्रा. सुरेश गणपतराव घुरे
शारीरिक शिक्षण संचालक
कला, वाणिज्य व विज्ञान
महा. गडहिंग्लज

**उषाची ओळख :**

ऑलिम्पिक खेळ स्पर्धेची सुरवात इ.स. 1896 मध्ये ग्रीस या देशात झाली. परंतू हॉकी या खेळाव्यतिरिक्त इतर कोणत्याही सांघिक किंवा वैयक्तिक धावण्याच्या खेळ प्रकारात भारत देशासाठी एकाही खेळाडूने सुवर्ण पदक जिंकून दिलेले नव्हते. खाशाबा जाधव या महाराष्ट्रीयन मल्लाने कुस्ती या खेळ स्पर्धेत इ.स. 1952 मध्ये एक कास्यपदक जिंकून दिले होते. त्यानंतर कित्येक वर्षे या स्पर्धेमध्ये भारताने आपले खाते उघडले नव्हते.

केरळ राज्यांतील उदयोन्मुख पदमशाली सुवर्णकन्या तथा वायूकन्या पी.टी.उषा (पिलावुल्लाकंडी येक्कंपेरांबिल उषा) धावण्याच्या शर्यतीमध्ये खेळण्या–बागडण्याच्या इवल्याशा कोमल वयापासून प्रशंसनिय, उल्लेखनिय व अतुलनीय कामगीरी करीत होती. शालेय, राज्य व राष्ट्रीय स्पर्धेतील उषाची कामगीरी व कौशल्य पाहूण ऑलिम्पिक स्पर्धेत धावण्याच्या क्रीडा प्रकारात ही वायूकन्या भारताला भविष्यात सुवर्णपदक निश्चितच जिंकून देईल व भारताचे नाव जगात गाजवेल असा विश्वास भारतीयांना वाटत होता. उषाने धावण्याच्या क्रीडा प्रकारात केलेल्या प्रगतीमुळे भारतीयांच्या आशा पल्लवीत केल्या. पी.टी. उषा ही भारताच्या सर्व श्रेष्ठ महिला व पुरुष धावपट्टू खेळाडू पैकी एक आहे. या क्रीडा प्रकारात उषाने आपले एक उच्च दर्जाचे वेगळे स्थान प्रस्तापीत केले आहे. ऑलिम्पिक खेळ स्पर्धेतील धावण्याच्या अडथळा शर्यतीत अंतिम आठ धावपट्टूमध्ये निवड होणारी ती पहिली भारतीय महिला.

इ.स. 1985 मध्ये लॉस एंजेलिस येथे संपन्न झालेल्या ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत 400 मी. धावण्याच्या अडथळा शर्यतीत 0.01 सेकंदाच्या फरकाने पिछाडीवर राहिल्यामुळे कास्यपदकापासून उषा वंचित राहिली. ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेतील तिची हि सर्वात्कृष्ट कामगीरी हि कामगीरी पाहून भारत सरकारने तिला अर्जुन पुरस्कार त्याचबरोबर पदमश्री ही उपाधी बहाल केली.

**जन्म व शिक्षण :**

पी.टी.उषाचा जन्म 27 जून 1964 रोजी केरळ या राज्यातील पय्योली या गावापासून 18 किलोमीटर अंतरावर असलेल्या कुटटाली या लहानशा खेडेगावी एका गरीब कुटूंबात आला. उषाचा जन्म झाला तेव्हा तिचे आजोबा एका कवितेचे वाचन करीत होते. त्या कवितेमध्ये उषा नावाचे एक चरित्रात्मक पात्र होते. या पात्राच्या नावावरून तीचे नाव उषा ठेवले. पटटोली येथील त्रिकोचूर (शाळेत तीचे प्रारंभिक शिक्षण झाले. घरची आर्थिक परिस्थिती गरिबीची असल्यामुळे तिने आपले शिक्षण शासकीय शिष्यवृत्ती मिळवून पूर्ण केले. राज्य शासनाने सुरू केलेल्या उच्च माध्यमिक खेळ शाळेत आपल्या वर्गात प्रवेश घेतला व 1980 ला ती एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण झाली. त्यानंतर तिने उच्च माध्यमिक शिक्षण पालघाट येथील महाविद्यालयात प्रवेश घेतला तिथे तीला ओ.एम.नाबियार यांनी प्रशिक्षण दिले.

**उषातील प्रतिभेचा उदय :**

1974 मध्ये वयाच्या दहाव्या वर्षी चौथ्या वर्गात शिकत असताना धावण्याच्या स्पर्धेत तिने 100 मी. शर्यतीत दुसरा क्रमांकपटकवला व धावपट्टू जीवनाचा श्रीगणेशा केला. 1976 मध्ये सातव्या वर्गात शिकत असताना तीने जिल्हा उपविजेत्या महिला धावपट्टू खेळाडूस हरवून सुवर्णपदक पटकावले. सन 1977 मध्ये कोट्टायम (केरळ) येथे संपन्नझालेल्या केरळ राज्यस्तरीय खेळ स्पर्धामध्ये उषाने राष्ट्रीय विक्रम स्थापन करून ती एक राज्यस्तरीय उदयान्मुख धावपट्टू म्हणून नावारूपाला आली.

**उषा आणि राष्ट्रीय स्पर्धा :**

कोन्नानूर शासकीय खेळ शाळेत ओ.एम.नांबियार यांच्या मार्गदर्शनाखाली उषाची प्रतिभाशक्ती विकसीत झाली. उषाच्या अथक परिश्रमातून धावण्याच्या विविध प्रकारच्या शर्यतीत तब्बल 20 वर्ष सहभागी राष्ट्रीय स्तरावर 90 सुवर्णपदके जिंकून नवीन एक विक्रम प्रस्थापित केला. म्हणूनच तिला सुवर्णकन्या असे संबोधले जाते.

**उषा आणि आशियाई स्पर्धा :**

उषाची आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी सफर 1982 मध्ये नवी दिल्ली. येथे संपन्न झालेल्या आशियाई स्पर्धेपासूनझाली. उषाने 1982, 1986, 1990, 1994 व 1998 मध्ये संपन्न झालेल्या दिल्ली, सव्हूल, बिजींग, हिरोशिमा व बँकॉक येथील आशियाई खेळ स्पर्धेत सातत्याने तब्बल 20 वर्ष सहभागी होणारी ती एकमेव भारतीय खेळाडू आशियाई खेळ स्पर्धेमध्ये सहभाग घेवून तिने 4 सुवर्णपदके, 7 रजतपदके असे एकूण 11 पदके जिंकली आहेत.

**आशियाई क्रीडा स्पर्धेमधील पदकांचे क्रमबध्द वितरण :**

1. 1982 नवी दिल्ली येथे झालेल्या नवव्या आशियाई स्पर्धेमध्ये 100 मी व 200 मी धावण्याच्या शर्यतीत 2 रजत पदके.
2. 1983 कुवेत येथे झालेल्या आशियांई स्पर्धेमध्ये 1 सुवर्ण व 1 रजत पदक.
3. 1985 जर्काता येथे झालेल्या अशियन स्पर्धेमध्ये 5 सुवर्ण व 1 कास्य पदक व या स्पर्धेमध्ये तिला या कामगिरीबद्दल आशियाची उत्कृष्ठ धावपट्टू म्हणून गौरवण्यात आले.
4. 1986 सव्हूल येथे झालेल्या आशियाई स्पर्धेमध्ये तीने 4 सुवर्ण पदके व 1 रजत पदक जिंकले. या स्पर्धेमध्ये तीला आशियाई वायू कन्या ही उपाधी बहाल करण्यात आली.
5. 1987 सिंगापूर येथे संपन्न झालेल्या आशियन स्पर्धेमध्ये 3 सुवर्ण व 1 रजत पदके जिकले.
6. 1989 मध्ये संपन्न झालेले आशियाई स्पर्धेमध्ये 4 सुवर्ण व [illegible] रजत पदके जिंकली व पुन्हा आशियातील खेळाडू म्हणून गौरवण्यात आले.
7. 1990 बिजींग आशियाई स्पर्धेमध्ये 3 रजत पदके जिंकली.
8. 1994 हिरोसीमा 1 रजत पदक जिंकले.
9. 1998 जपान आशियाई स्पर्धेत 1 सुवर्ण व 2 कास्य पदके जिंकली.

अशा प्रकारे सर्व आशियन खेळ स्पर्धेत सहभागी होवून 18 सुवर्ण पदके 14 रजत व 1 कास्य पदक अशी एकूण 33 पदके मिळवली.

**उषा आणि ऑलिम्पिक स्पर्धा :**

सन 1980 मध्ये मॉस्को येथे संपन्न झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये वयाच्या 16 व्या वर्षी उषाची भारतीय संघामध्ये निवड झाली. ऑलिम्पिक मध्ये सहभाग होणारी सर्वात लहान भारतीय खेळाडू म्हणून तीने एक नवीन विक्रम प्रस्तापित केला. तिने सन 1980, 1984, 1988 व 1996 मध्ये अनुक्रमे मॉस्को, लॉसएँजिल्स, सवुल व अटलांटा येथे संपन्न झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत सक्रीय सहभाग नोंदवला. सन 1984 लॉस इंजिल्स ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये 400 मी. अडथळा स्पर्धेमध्ये [illegible]52 सेकंद वेळ देऊन तिचा चतुर्थ क्रमांक आला. फक्त 0.01 सेकंदाच्या नगण्य सेकंदाने कास्य पदकापासून वंचित राहिली.

**उषा व तिचे प्रशिक्षक :**

उषाला कन्नानोर येथे प्राथमिक खेळ शाळेत प्रशिक्षक म्हणून श्री. ओ.एम.नांबियार लाभले. त्यांना खात्री होती की उषा एक जागतिक दर्जाची धावपटू बनू शकते. नांबियार हे उषाचे 20 वर्षे प्रशिक्षक व मार्गदर्शक म्हणून लाभल्यामुळे उषा एक महान धावपट्टू म्हणून उदयास आली. नांबियार हे उषाच्या घराशेजारी राहत होते. त्यामुळे त्यांचे प्रशिक्षण पहाटे 5 वा. पासून सुरू होत असे. नांबियार यांच्या मार्गदर्शनाखाली उषा दररोज 4 तास अथक प्रशिक्षण घेत असे. तीने एक ही दिवस प्रशिक्षणात खंड पडू दिला नाही. नांबियार यांनी दिलेल्या प्रशिक्षणातूनच ही एक आंतरराष्ट्रीय दर्जाची सुवर्णकन्या ठरली.

मानसन्मान व पुरस्कार :

उषाने आंतराष्ट्रीय स्पर्धेमध्ये 102 पदके, राष्ट्रीय स्पर्धेत 600 पेक्षा जास्त पदके जिंकून तिंने अनेक विक्रमी पदके जिंकली. या कामगिरीची दखल घेऊन भारतीय ऑलिम्पिक संघटनेने तिला वीसाव्या शतकातील सर्वोत्कृष्ट किताब/पुरस्कार हा बहाल केला. केरळ सरकारनं तिला आधुनिक साई सुविधायुक्त एक प्रशस्त घर दिले. रेल्वे विभागाणे तिला क्रिडाधिकारी ही पदवी दिली. तिला मिळालेल्या पुरस्काराचे वितरण खालीलप्रमाणे :-

1) 1983 भारत सरकारने अर्जुन पुरस्कार बहाल केला.
2) 1984 पद्मश्री भारत सरकारने देवून गौरवण्यात आले.
3) 1984 व 1986 मध्ये आशियातील सर्वोत्त खेळाडु म्हणून विश्व ट्रॉफी देवून तिचा सन्मान केला.
4) 1985 आशियातील सर्वोत्त महिला खेळाडू म्हणून गौरवण्यात आले.
5) कन्नूर विद्यापीठाने उषाला मालद डॉ. पदवी देवून तिला गौरवण्यात आले.

**उषाची क्रीडा अकादमी :-**

पी. टी. उषा खेळ जिवणातून 1990 मध्ये कायमचा संन्यास घेतला.व त्यानंतर तीने पी. टी. उषा स्कूल ऑफ. ॲथेलेस्टिक ॲकडमी नामक क्रिडा संस्था आपल्या गावी स्थापन केली. देशातून झालेल्या प्राप्त सन्मातूनं परतफेड म्हणून ही नवीन प्रतिभावंत युवक युवतींना प्रशिक्षण देवून आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी तयारी करण्यासाठी तिनं ही अकादमी स्थापन केली. तीच एक स्वप्न होते की, या अकादमीतुन प्रशिक्षित झालेल्या प्रशिक्षणार्थीने ऑलिम्पिक स्पर्धेत एखाद पदक जिंकुन आणावं कोझिकोड या गावी अकादमी स्थापन केली. देशातील आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणारं खेळाडु जेव्हा संन्यास घेतात तेव्हा त्यांचा अनुभव सुध्दा त्यांच्या सोबतच संपुष्टात येतो. त्यांच्या अनुभवाचा लाभ, भावी प्रतिभवंत खेळाडुंना होत नाही. ही अति दुःखाची गोष्ट आहे. ही भारताची शोकांतीका आहे.

**सारांश :-**

पी. टी. उषा ही एक भारताच्या सर्व श्रेष्ठ महिला धावपटू पैकी एक आहे. तीने आंतरराष्ट्रीय व जागतिक स्पर्धेत सुमारे 35 पदकं जिंकली आहे. भारतीय महिला क्रीडा विश्वामध्ये ती एक आदर्श आहे. तीच्या प्रेरणेतुन अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू भारतामध्ये तयार झाले. उषाने सुरु केलल्या पी. टी. उषा स्कूल ऑफ ॲथेलेस्टिक ॲकडमी मधून अनेक प्रतिभावंत युवक – युवतींना प्रशिक्षण मिळून ते आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी तयार झाले आहेत.

क्रीडा संचालकांनी व क्रीडा मंत्र्यांनी सकारात्मक पाऊल उचलून क्रीडा संस्थांना व खेळाडुंना योग्य अनूदान व सोयी – सुविधा पुरविल्यास देशामध्ये अनेक आंतरराष्ट्रीय स्तरावर कामगीरी करणारे खेळाडू तयार होतील.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

1) वायुकन्या उषा :- प्रा. विजय यंगलवार
2) भारतीय खेळाडू – अंजली खळदकर